**L. A. BILL No. XXIX OF 2024.**

A BILL

FURTHER TO AMEND THE HYDERABAD ABOLITION OF INAMS AND CASH GRANTS ACT, 1954.

**सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९.**

**हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९५५ चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक ८.

२०२४ चा महा. अध्या. ८.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २४ सप्टेंबर २०२४, रोजी हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या पंच्याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०२४, असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९५५ चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम २अ ची सुधारणा.

१९५५ चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक ८.

**२.** हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ (यात यापुढे ज्याचा निर्देश, "मुख्य अधिनियम" असा केला आहे) याच्या कलम २अ मधील, पोट-कलम (३) नंतर, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

"परंतु, जेव्हा अपवादात्मक प्रकरणांमध्ये, पोट-कलम (१) खालील अधिकाऱ्याच्या निर्णयाच्या कायदेशीरपणासंबंधीच्या तक्रारींवरून, एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर देखील अशा आदेशांचा कायदेशीरपणा, औचित्य किंवा नियमितपणा तपासणे आवश्यक आहे, अशी राज्य सरकारची खात्री पटली असेल त्या बाबतीत, राज्य सरकारला किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या विभागीय आयुक्तास, उक्त कालावधी संपल्यानंतर अशा अधिकारांचा वापर करता येईल.".

सन १९५५ चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक ८ याच्या कलम ६ ची सुधारणा.

**३.** मुख्य अधिनियमाच्या कलम ६ मध्ये, पोट-कलम (३) मधील,—

(१) खंड (अ) मध्ये, —

(अ) पहिल्या परंतुकामधील, " पन्नास टक्के " या मजकुराऐवजी, " पाच टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ब) दुसऱ्या परंतुकामधील, " अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्के " हा मजकूर, ज्या दोन ठिकाणी आला आहे त्या दोन्ही ठिकाणी त्याऐवजी, " अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पाच टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल;

(२) खंड (ब) मध्ये, परंतुकामधील, " पन्नास टक्के " या मजकुराऐवजी, " पाच टक्के " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन २०२४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ८ यांचे निरसन व व्यावृत्ती.

२०२४ चा महा. अध्या. ८.

**४.** (१) हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २०२४, हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

(२) अशाप्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा, यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

## उद्देश व कारणे यांचे निवेदन

हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ (१९५५ चा हैद्राबाद अधिनियम क्रमांक ८) याच्या कलम २अ मध्ये इनामे संबंधातील विवक्षित प्रश्नांवर निर्णय देण्याच्या राज्य सरकारच्या किंवा अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याच्या अधिकारांची आणि व्यथित झालेल्या व्यक्तींनी जिल्हाधिकारी व विभागीय आयुक्त यांच्याकडे अपिले दाखल करण्याची तरतूद केली आहे. उक्त कलम २अ च्या पोट-कलम (३) मध्ये अशी तरतूद केली होती की, राज्य सरकारला, अपील करण्याची मुदत संपल्यानंतर, परंतु अशा निर्णयाच्या तारखेपासून एक वर्षाहून उशिराची नसेल अशा मुदतीत, अशा अधिकाऱ्याच्या कामकाजाचा किंवा निर्णयाचा कायदेशीरपणा, औचित्य किंवा नियमितपणा यांविषयी स्वतःची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी अधिकृत अधिकाऱ्याच्या कामकाजाची कागदपत्रे मागविता येतील.

२. विवक्षित इनाम जमिनींच्या बाबतीत,पोट-कलम २अ अन्वये अधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशांच्या कायदेशीरपणाविषयीच्या, विवक्षित तक्रारींची चौकशी केल्यावर, अशा आदेशांचे पुनरीक्षण करण्याची गरज आहे अशी शासनाची खात्री पटली होती. म्हणून, अपवादात्मक प्रकरणांमध्ये, अशा आदेशांचे पुनरीक्षण करणे सरकारला किंवा प्राधिकृत केलेल्या विभागीय आयुक्तास शक्य व्हावे या दृष्टीने, उक्त कलम २अ च्या पोट-कलम (३) मध्ये सुयोग्य सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले होते.

३. इनाम जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्के इतकी रक्कम नजराणा म्हणून व विवक्षित दंड म्हणून सरकारला प्रदान केल्यावर अशा जमिनीचे हस्तांतरण करण्याच्या, अनधिकृत हस्तांतरण नियमित करण्याच्या व भोगवटयाचे रूपांतरण करण्याच्या दृष्टीने, महाराष्ट्र शासनाने, सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याद्वारे, उक्त अधिनियमाच्या कलम ६ च्या पोट-कलम (३) मध्ये सुधारणा केली आहे. उक्त पोट-कलम (३) च्या तरतुदींचा, त्यात सुधारणा करण्याची गरज आणि त्यांचे संभाव्य परिणाम यांचा अभ्यास करण्यासाठी शासनाने महसूल अधिकाऱ्यांची एक समिती स्थापन केली होती. उक्त समितीने, तिच्या अहवालात असे नमूद केले होते की, गेल्या अनेक वर्षांमध्ये अशा जमिनींच्या बाजारमूल्यात वाढ झालेली असल्याने, वर निर्दिष्ट केलेल्या सुधारणेनुसार अशा जमिनींचे हस्तांतरण, नियमितीकरण किंवा रूपांतरण करण्यासाठी अनुदान धारकांकडून अल्प प्रतिसाद मिळत आहे. म्हणून, उक्त समितीने नजराण्याची रक्कम कमी करण्याची शिफारस केली होती लोकप्रतिनिधींकडून प्राप्त झालेली विविध निवेदने आणि उक्त समितीची शिफारस विचारात घेता, उक्त कलम ६ मध्ये सुयोग्य सुधारणा करून, इनाम जमिनींचे हस्तांतरण, नियमितीकरण व भोगवटयाचे रूपांतरण करण्यासाठी कलम ६ च्या पोट-कलम (३) अन्वये, प्रदेय असलेली नजराण्याची रक्कम कमी करणे आवश्यक होते, असे वाटले.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ यात आणखी सुधारणा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे, जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती, आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २४ सप्टेंबर २०२४ रोजी हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) अध्यादेश, २०२४ (२०२४ चा महा. अध्या. ८), हा प्रख्यापित केला होता.

५. उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रुपांतर करणे हा या विधेयकाचा हेतू आहे.

नागपूर,
दिनांक १५ डिसेंबर, २०२४.

**देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री.

**सन २०२४ चे वि. स. विधेयक क्रमांक २९ हैद्रावबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबात (सुधारणा) विधेयक, २०२४ याचे परिशिष्ट**

**(हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ यातील उतारे)**

**(सन १९५४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-८)**

**१,** व **२.** XX XX XX

[२-अ. (१) (एक) कोणतीहि जमीन ही इनाम जमीन आहे किंवा नाही.

इनामे आणि अपिले यांच्या संबंधातील विवक्षित प्रश्नावर निर्णय देण्याचा राज्य सरकारचा किंवा अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याचा अधिकार

(दोन) कोणतेहि इनाम हे सेवा करण्याच्या शर्तीवर किंवा शर्तीशिवाय किंवा जमीन महसुलाच्या संपूर्ण किंवा अंशतः सुटीसह किंवा सुटीशिवाय धारण केलेले आहे किंवा नाही ;

(तीन) कोणतेंहि इनाम हें समाजसेवा इनाम किंवा वतन आहे किंवा नाहीं ;

(चार) कोणत्याहि वतनाच्या संबंधांत मोबदल्या बाबत तडजोड झालेली आहे. किंवा नाहीं,

(पांच) इनाम म्हणून धारण केलेली कोणतीहि जमीन ही सक्षम प्राधिकाऱ्याच्या परवानगीवांचून दुसऱ्याच्या नांवे करून देतां येते किंवा नाहीं,

(सहा) कोणताहि इसम काबिझ-ए-कदीम, कायम कूळ किंवा कूळ आहे किंवा नाहीं, यासंबंधी कोणताहि प्रश्न उद्‌भवला तर, राज्य सरकारने किंवा त्या सरकारने अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने त्या प्रश्नावर निर्णय दिला पाहिजे.

(२) राज्य सरकारने अशा रीतीनें अधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने अशा कोणत्याहि प्रश्नावर निर्णय दिला असेल त्या बाबतीत, अशा निर्णयामुळे नुकसान पोहोंचलेल्या कोणत्याहि इसमास अशा निर्णयाच्या तारखेपासून नव्वद दिवसांच्या आंत राज्य सरकारकडे अपील करता येईल.

(३) जर अशा अधिकाऱ्याच्या निर्णयावर पोट-कलम (२) अन्वये कोणतेंहि अपील दाखल करण्यांत आले नाहीं तर, अपील करण्याची मुदत संपल्यानंतर, परंतु, अशा निर्णयाच्या तारखेपासून एक वर्षाहून उशिरा नाहीं अशा मुदतींत, राज्य सरकारला, अशा अधिकाऱ्याच्या कामकाजाच्या किंवा निर्णयाच्या वैधतेविषयों, औचित्याविषयी किंवा नियमानुसार असण्याविषयी स्वतःची खात्री करून घेण्याच्या कारणांसाठी अशा कामकाजाचे कागदपत्र मागविण्याचा अधिकार आहे आणि त्यावर त्याला योग्य वाटेल असा आदेश देण्याचा अधिकार आहे.

(४) XX XX XX

**३.** ते **५.** XX XX XX

**६.** (१) व (२) XX XX XX

कलम ५ चे उपबंध लागू नसलेल्या भोगवटयाखालील जमिनीचे बाबतीत भोगवट्याचे हक्क

“(३) (अ) हैदराबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत (सुधारणा) अधिनियम, २०१५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास (यात यापुढे, या पोट-कलमात, ज्याचा निर्देश “ प्रारंभाचा दिनांक ” असा केला आहे) किंवा त्यानंतर, भोगवटादारास, नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण केलेल्या मदद मश इनाम जमिनींचा भोगवटा, कृषीसंबंधी प्रयोजनासाठी हस्तांतरित करता येईल आणि अशा हस्तांतरणासाठी जिल्हाधिकारी किंवा इतर कोणताही सक्षम प्राधिकारी याच्याकडून कोणतीही पूर्वमंजुरी किंवा कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता असणार नाही, अशा हस्तांतरणानंतर असा हस्तांतरिती भोगवटादार अशा जमिनीचा भोगवटा, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या तरतुदींनुसार नवीन व अविभाज्य : शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण करणे चालू ठेवील :

परंतु, प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर. भोगवटादारास, नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार वर्ग दोन) धारण केलेला असा कोणताही भोगवटा, अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्के इतकी रक्कम नजराणा म्हणून शासनाला प्रदान करून, भोगवटादार वर्ग एक मध्ये रुपांतरित करता येईल, आणि अशा रुपांतरणानंतर भोगवटादार, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या तरतुदींनुसार अशी जमीन, भोगवटादार-वर्ग एक म्हणून धारण करील :

परंतु आणखी असे की, प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यानंतर, जर भोगवटादाराकडून, नवीन व अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार-वर्ग दोन) धारण केलेला कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीशिवाय आणि अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्के इतकी रक्कम प्रदान करण्यात आल्याशिवाय कृषीतर उपयोगासाठी हस्तांतरित करण्यात आला असेल तर, अशा जमिनीच्या चालू बाजार मूल्याच्या पन्नास टक्के इतकी रक्कम नजराणा म्हणून आणि अशा रकमेच्या पन्नास टक्के इतकी रक्कम दंड म्हणून प्रदान करण्यात आल्यावर असे हस्तांतरण नियमित करता येईल आणि अशी रक्कम प्रदान करण्यात आल्यावर भोगवटादार, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या तरतुदींनुसार ती जमीन भोगवटादार वर्ग एक म्हणून धारण करील.

(ब) प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, जर भोगवटादाराने, नवीन व अविभाज्य शर्तीवर ( भोगवटादार वर्ग दोन ) धारण केलेल्या मदद मश इनाम जमिनींच्या कोणत्याही भोगवट्याचे जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय किंवा ना-हरकत प्रमाणपत्राशिवाय कृषीसंबंधी प्रयोजनासाठी, आधीच हस्तांतरण केले असेल तर, अशा हस्तांतरणाचा पुरावा म्हणून, त्याचे विक्री खत, बक्षीसपत्र, इत्यादींसारखे नोंदणीकृत संलेख सादर केल्यानंतर, नजराणा म्हणून कोणतीही रक्कम प्रदान न करता, असे हस्तांतरण नियमित करता येईल. असे हस्तांतरण नियमित करण्यात आल्यानंतर, अशा जमिनीचा भोगवटा अशा हस्तांतरिती भोगवटादाराने महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ याच्या तरतुदीनुसार भोगवटादार वर्ग दोन म्हणून धारण केला असल्यांचे मानण्यात येईल :

परंतु, प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, जर भोगवटादाराकडून, नवीन आणि अविभाज्य शर्तीवर (भोगवटादार-वर्ग दोन) धारण केलेल्या मदद मश इनाम जमिनींचा असा कोणताही भोगवटा, जिल्हाधिकाऱ्याच्या किंवा इतर कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याच्या पूर्वमंजुरीशिवाय कृषीतर उपयोगासाठी आधीच हस्तांतरित करण्यात आला असेल तर, अशा नियमितीकरणाच्या आदेशाच्या दिनांकास, अशा जमिनीच्या बाजार मूल्याच्या पन्नास टक्के इतकी रक्कम नजराणा म्हणून आणि अशा रकमेच्या दहा टक्के इतकी रक्कम दंड म्हणून प्रदान केल्यानंतर असे हस्तांतरण नियमित करता येईल आणि अशी रक्कम प्रदान करण्यात आल्यावर, भोगवटादाराने, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या तरतुदींनुसार ती जमीन अशा आदेशाच्या दिनांकापासून भोगवटादार - १ वर्ग एक म्हणून धारण केली असल्याचे मानण्यात येईल.

| | | | |
|---|---|---|---|
| (क) | XX | XX | XX |
| (४) ते (६) | XX | XX | XX |
| **७ ते ३८.** | XX | XX | XX |

## महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**[ सन २०२४ चे विधानसभा विधेयक क्रमांक २९. ]**

**[ हैद्राबाद इनामे व रोख अनुदाने रद्द करण्याबाबत अधिनियम, १९५४ यात आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक. ]**

[ **श्री. देवेंद्र फडणवीस,**
मुख्यमंत्री. ]

**जितेंद्र भोळे,**
सचिव (१) (कार्यभार),
महाराष्ट्र विधानसभा.

शासकीय मुद्रणालय, नागपूर.